# प्रेसनोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे क्र.०१ श्री.आकाश सुरेश क्षिरसागर, वय—३१ वर्षे, पद—कनिष्ठ अभियंता, वर्ग—३, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, ग्रामीण विभाग क्र.०३, मलकापूर ता.मलकापूर जि.बुलढाणा<br>आलोसे क्र.०२ श्री.महादेव कडू पारधी, वय—३६ वर्षे, व्यवसाय—नोकरी, पद—वरिष्ठ तत्रंज्ञ, वर्ग—३, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, विभाग क्र.०३, मलकापूर ता.मलकापूर जि. बुलढाणा |
| लाच मागणी | ४०,०००/— रूपये तडजोडीअंती २०,०००/—रुपये |
| घटनास्थळ | श्रीकृष्ण अॅक्वा आरओ प्लान्ट व बेलाडफाटा, मलकापूर |
| घटना तारीख | २९.०१.२०२४ |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तकारदार यांनी त्यांचे मुलाचे अॅक्वा आरओ प्लान्टचे औदयोगीक विज मिटरमधुन शेतीसाठी वापरलेल्या विजेबाबत विज चोरीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व अॅव्हरेज बिल कमी दाखविण्यासाठी वायरमन श्री.पारधी यांनी कनिष्ठ अभियंता श्री.क्षिरसागर,म.रा.वि.वि.क.मर्या मलकापुर विभाग ३ हे ४००००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याची तकार लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा घटकाकडे केली होती.

त्यानुसार दिनांक २९.०१.२०२४ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, यातील लोकसेवक वायरमन श्री.महादेव पारधी यांनी लोकसेवक कनिष्ठ अभियंता श्री.आकाश क्षिरसागर यांचेसाठी पुर्वी ६००००/—रुपये घेतल्याची स्पष्टोक्ती देवुन तडजोडअंती २०,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले तसेच लोकसेवक कनिष्ठ अभियंता श्री.आकाश क्षिरसागर यांनी वायरमन श्री.पवार यांचे मार्फत लाच स्विकारण्यास संमती दर्शविल्याचे स्पष्ट झाले. त्यावरुन दिनांक २९.०१.२०२४, दिनांक ०१.०२.२०२४ व दिनांक १२.०२.२०२४ रोजी आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान तकारदार यांचेवर संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही. तकारदार यांनी आज दिनांक १२.०२.२०२४ रोजी दिलेल्या फिर्यादिवरुन नमुद दोन्ही लोकसेवकांच्या विरुध्द लाच मागणी संबधाने पोलीस स्टेशन मलकापुर शहर येथे अपराध क्र.५५/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही :—१.मा.श्री.मारोती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती, परिक्षेत्र अमरावती
२.मा.श्री.अनिल पवार, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती, परिक्षेत्र अमरावती
३.श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा
यांचे मार्गदर्शनाखाली

कार्यवाही पथक :— पोलीस निरीक्षक श्री.सचिन इंगळे, अॅ.क.ब्यु.बुलढाणा, पोहेकॉ प्रविण बैरागी, नापोकॉ जगदीश पवार, पोकॉ गौरव खत्री, शैलेश सोनवणे, रंजीत व्यवहारे व चालक नापोकॉ नितीन शेटे व अर्शद शेख यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२—२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा यांनी केले आहे.

पोलीस उप अधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा
सत्यमेव जयते

Sachin
(सचिन इंगळे)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा

Scanned with CamScanner